
## • Research Papers Published in Peer-Reviewed Journals/ Proceeding & Other

| Name of Faculty | **Dr.Vijay Jalindar Dethe** |
|---|---|
| Name of Department | Political science |
| Academic Year | 2023-2024 |

| Sr. No. | Name of Research Papers Book/Edited Book/ Chapter | Name of the Per0Reviewed Journal and Publication | Page No |
|---|---|---|---|
| १ | भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने | B. Aadhar Multidisciplinary International Research Journal, ISSUE NO (CDLXIII) 46,Impact Factor8.632 (SJIF 2278-9308 Aadhar International Publication Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati. | पान २५२ ते २५५ |
| २ | शाश्वत विकास: ध्येय आणि जागतिक परिस्थिती | Vidyavarta Special Issue 01, Peer Reviewed International Refereed Research Journal 2319-9318 Harshwardhan Publication Pvt. Ltd Limbaganesh, Dist. Beed Maharashtra | पान १४३ ते १४६ |

.

1. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने



ISSN : 2278-9308
March, 2024


| | | |
|---|---|---|
| | **प्रा. डॉ. संजय शिवाजी ओमासे** | |
| 46 | भारतातील मानव संसाधन विकास **सहा.प्रा.सोनाली काशिनाथ गवळी** | 216 |
| 47 | विकास पर्यावरण आणि शाश्वतता **सहा. प्रा. सुषमा युवराज पाटील** | 220 |
| 48 | भारतातील महिला सक्षमीकरण आणि महिला साक्षरता **प्रा. किरण सदाशिव कांबळे** | 225 |
| 49 | अमृतमहोत्सवी भारतीय अर्थव्यवस्था : एक दृष्टीक्षेप ! **श्री. चंद्रकांत भूपाल पाटील ,प्राचार्य. डॉ.विजयकुमार पाटील** | 229 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील पर्यावरणीय समस्या **प्रा. वर्षा संदीप पाटील** | 236 |
| 51 | नवीन शैक्षणिक धोरण आणी उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण **डॉ. आर. डी. मांडणीकर** | 241 |
| 52 | सातारा जिल्ह्यातील भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा अभ्यास **श्री. तेजस चव्हाण ,डॉ. डी. एल. काशिद-पाटील ,श्री. गौरव काटकर** | 246 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने **डॉ. विजय जालिंदर देठे** | 252 |
| 54 | मौजे आगर मधील जाधव पोल्ट्री फार्म : एक आर्थिक चिकित्सक अभ्यास **प्रा.डॉ. प्रभाकर तानाजी माने** | 256 |
| 55 | डॉ.शां.ग.महाजन यांचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र साहित्यातील योगदान **सौ.नीता पाटील** | 261 |
| 56 | उच्च शिक्षणातील सल्लागार, मार्गदर्शक, दीपस्तंभ: प्रा. सुधाकर मानकर सर. **डॉ.पांडुरंग बाळकृष्ण पाटील** | 268 |
| 57 | भारत में खेल विकास के लिए योजनाएँ **Capt. Dr. Prashant Bibhishan Patil** | 271 |
| 58 | आजाद भारत की आर्थिक विषमता और जनवादी कवि 'धूमिल' **प्रो.डॉ.सरोज पाटील** | 273 |
| 59 | आर्थिक विपन्नता के परिप्रेक्ष्य में उपन्यास 'बरखा रचाई' **प्रा. डॉ. सारिका राजाराम कांबळे** | 277 |
| 60 | भाषा प्रौद्योगिकी : चिंतन और रोजगार **डॉ. अक्षय राजेंद्र भोसले** | 280 |
| 61 | Regional Trend Of Milk Production In Maharashtra State Aishwarya Hingmire **Mayur Goud, Dr. D. L. Kashid -Patil Dr. N. D. Kashid- Patil** | 285 |
| 62 | Micro Study of Demographic Characteristics of Gaganbavda Tehsil in Kolhapur District **Mr. Shubham Tanaji Patil, Dr. D. L. Kashid-Patil** | 290 |
| 63 | Impact Of Marxism On English Literature **Mrs. S. K. Desai** | 299 |
| 64 | Charting the Course: Navigating Challenges and Opportunities in India's Economic Development Landscape **Ms.Komal Suresh Jagtap** | 301 |
| 65 | कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक शेतीक्षेत्रातील मृदा परीक्षणाचा चिकित्सक अभ्यास **प्रा. गौरव काटकर,डॉ. सौ. एन. डी. काशिद-पाटील,प्रा. तेजस चव्हाण** | 305 |

# ''भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने''

**डॉ. विजय जालिंदर देठे**
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर
ईमेल: dethevijay11@gmail.com ]मोबाईल नं.: 9011648987

**प्रस्तावना:**

१९४७ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेला शुन्यापासून सरुवात करावी लागली. भारतातील शेती संपूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. सुरुवातीपासून सद्यस्थितीपर्यंत भारताची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. सुरुवातीला भारतात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते तसेच भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था ही शेती या एकमेव साधनावर अवलंबून होती. १८१८ ते १९४७ या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटिशांच्या ताब्यात होती. १८६९ मध्ये सुएझ कालवा बांधून पूर्ण झाला त्यामुळे भारतातून इंग्लडला जाणारा खुष्कीचा मार्ग निर्माण झाला. परिणामी ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्थेला प्रचंड प्रमाणात लुटले. अशा प्रकारची भारतीय अर्थव्यवस्थेची सुरुवातीची अवस्था किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमी होती. परंतु कालमानानुसार भारतीय अर्थव्यवस्था परिवर्तनाच्या मार्गावर आली. हळूहळू भारतीय अर्थव्यवस्था विकसित होत गेली. या बदललेल्या अर्थव्यवस्थाचा लेखाजोखा प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये पाहणार आहोत.

**उद्दिष्टे**

भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने' या संशोधन पेपरसाठी पुढील उद्दिष्टे समोर ठेवून संशोधन पेपरची मांडणी करण्यात आली आहे.

१) ७५ वर्षातील भारतीय अर्थव्यवस्थेची बदललेली स्थिती अभ्यासणे.
२) उदयमुख अर्थव्यवस्था म्हणून अभ्यास करणे.
३) भारतीय अर्थव्यवस्थेच्या ठळक वैशिष्टयांचा अभ्यास करणे.
४) भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हानाचा ऊहापोह करणे.

**७५ वर्षात बदलेली अर्थव्यवस्था:**

ब्रिटिश सत्ताधिशांनी सुमारे दिडशे वर्षे भारतीय अर्थव्यवस्थेची मोठयाप्रमाणात लुट केली. १९४७ मध्ये भारत ब्रिटिशांच्या साम्राज्यातून एक स्वतंत्र देश म्हणून उदयास आला. तेव्हा पासून भारतीय अर्थव्यवस्थेचा लेखाजोख आपणास अभ्यासता येईल. प्रास्ताविकामध्ये अभ्यासल्या प्रमाणे भारतीय शेती पाऊसावर अवलंबून, साक्षरतेचे प्रमाण अत्यल्पमात्र लोकसंख्या मोठया प्रमाणात होती अशा पार्श्वभूमीवर भारत देश १९४७ मध्ये आपल्या अर्थव्यवस्थेला नव्याने व शुन्यातून सुरुवात करत होता. सुरुवातीच्या कालखंडामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवर पंडित नेहरुचा मोठयाप्रमाणात प्रभाव होता. नेहरु हे जरी लोकशाही व्यवस्थेमध्ये असले तरी त्यांच्यावर समाजवादाचा प्रचंड पगडा होता. 'समाजवादी पध्दत म्हणजे देशाची जी काही साधनसंपत्ती आहे त्यावर सरकारचा हक्क असणे'.

भारतीय स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरुंनी भारतीय अर्थव्यवस्था समजावादी पद्धतीने चालवण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतात कोणताही व्यवसाय सुरु करण्यास भारत सरकारची परवानगी घ्यावी लागत असे. भारतामध्ये ही पध्दत स्वातंत्र्यापासून ४०–४२ वर्ष सुरु होती. भारतीय राजकारणामध्ये राजीव गांधी यांच्या प्रवेशानंतर उदयोगावरील नियत्रंण काही प्रमाणात कमी करण्यास सुरुवात झाली. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये किमतीचे नियमन करणे कमी केले आणि उदयोगावरील कर कमी करण्यास सुरुवात झाली. परिणामी भारताचा विकास दर वाढण्यास सुरुवात झाली.

१९४७ पासून १९९० पर्यंत भारताला जागतिक बाजारपेठेत बंदी होती. १९९०–९१ मधील भिषण आर्थिक परिस्थितीमुळे तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला आणि आर्थिक उदारीकरणास सुरुवात झाली. तेव्हापासून भारतीय अर्थव्यवस्थेचे दरवाजे आंतरराष्ट्रीय कंपन्यासाठी खुले झाले तसेच आयातीवरील कर सुध्दा कमी केला याचा सकारात्मक परिणाम दिसू लागला. भारतात हळूहळू परकीय गुतवणूक मोठयाप्रमाणात वाढली. बँकींग क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली.

ISSN : 2278-9308
March, 2024

नवीन आर्थिक धोरणामुळे शासनाने नवीन खाजगी बँकांना परवानगी दिली. आयात–निर्यात धोरणानुसार निर्यात धोरणाला प्रोत्साहन देण्यात आले. १९९१ मध्ये रुपयाचे अवमुल्याकन करण्यात आले. त्यामुळे आयात –निर्यात, वैदयकीय खर्च व परकीय शिक्षण इ. पासून परकीय चलनाची उपलब्धता वाढली.

२००४ ते २०१४ या दहा वर्षाच्या कालखंडात तत्कालीन भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. २०१४ साली नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली सरकारने भारतातील अनेक क्षेत्र परकीय गुतवणूकीसाठी खुली केली. तसेच त्यांनी पायाभूत सुविधावर भर दिला. २०१६ साली काळयापैश्यावर नियंत्रण घालण्यासाठी नोट बंदी सारखा निर्णय घेतला. 'एक देश एक कर' प्रणाली सारख्या आर्थिक सुधारणेवर भर दिला. कर कमी केले गेले. तसेच भारतामध्ये ऑनलाईन व्यवहारास मोठया प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आले.

जगामध्ये सद्यस्थितीत महागाईने उच्चांक गाठला आहे. भारतीय अर्थव्यवस्था कच्चे तेल वगळता इतर मुलभूत गोष्टीबाबतीत जगावर अवलंबून नाही. भारतीय अर्थव्यवस्था कासवाच्या गतीने भक्कम होत आहे. भारतामध्ये GST मध्ये प्रत्येक महिन्यात वाढ होत चालली आहे. २०२२–२३ या आर्थिक वर्षात भारताला GST मधून १.४७ लाख कोटी रुपये महसूल गोळा झाला याचा अर्थ व्यवसाय वृध्दी वाढत चालली आहे. भारताचा GDPदर जगामधील विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेत चांगला आहे. जगाची अर्थव्यवस्था १०० ट्रिलियन डॉलरची झाली आहे. यामध्ये अमेरिका २५.३ ट्रिलियन डॉलर, चीन १९.९ ट्रिलियन डॉलर, जपान ४.९ ट्रिलियन डॉलर तर भारत ३.३ ट्रिलियन डॉलर हिस्सा आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टे**

**१) उपभोग्य वस्तूच्या मागणीचे जास्त प्रमाण**

जगभरातील बहुसंख्याक देशाची आकडेवारी पाहिली असता भारतात मध्यमवर्गीयाचे व तरुणांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे उपभोग्यवस्तूची मागणी जास्त प्रमाणात आहे. भारतामध्ये जगातील प्रत्येक धर्माचे लोक राहतात. भारतात प्रत्येक धर्माचे लोकांचे राहणीमान असल्यामुळे वर्षभर कोणत्याना कोणत्या धर्माचा सण प्रत्येक महिन्यात असतो. त्यामुळे वर्षभर अनेक वस्तूंची मागणी होत असते.

**२) गुंतवणूकदारांची भारताला पसंती**

जगभरातील मोठी बाजारपेठ म्हणून भारताला ओळखले जाते. मोठी बाजारपेठ असल्यामुळे वस्तूची मागणी मोठया प्रमाणात होते. परदेशी उदयोगपती जास्तीत जास्त वस्तू निर्माण करुन भारतात विकण्यास प्राधान्य देतात. परदेशी थेट गुतवणूक, शेअर मार्केट, बॉन्स मध्ये गुंतवणूक मोठया प्रमाणात होते असल्यामुळे परदेशी गुंतवणूकदार जास्त पसंती भारताला देतात.

**३) जागतिक अर्थव्यवस्थेचे इंजिन**

भारतीय अर्थव्यवस्था ही उदयन्मुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. तसेच विकसित अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. विकसित देशामधील लोकसंख्या ही वयोवृध्द होत आहे. वयोवृध्द लोकसंख्या ही विकसित देशासमोरील मोठे आव्हान आहे. तर भारतामध्ये सरासरी युवकांचे वयोमान हे २९ वर्ष आहे. उदयोग धंदयासाठी लागणारा तरुण कामगार भारतात मोठया प्रमाणात आहे. मोठी बाजारपेठ, मुबलक कामगार यामुळे जगातील उदयोगपती भारतामध्ये गुंतवणूक करण्यास पसंती देत आहेत. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेचे इंजिन म्हणून ओळखतात.

**४) जागतिक ५ वी अर्थव्यवस्था**

'विम बर्ग'च्या अहवालानुसार अमेरिकन डॉलरच्या गणणेनुसार आणि IMFच्या GDPडेटानुसार भारताने २०२३ साली जगामध्ये ५ वी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर ५ व्या स्थानावर आली. युरोप खंडामध्ये आर्थिक मंदी असताना भारताने देशांतर्गत अर्थव्यवस्थेच्या वेगवान वाढीसह आपली अर्थव्यवस्था भक्कम केली. दहा वर्षापूर्वी भारत जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थेच्या बाबतीत ११ व्या स्थानावर होता. २०२३ साली भारत ५ व्या स्थानावर पोहचला. जागतिक अर्थव्यवस्थाची क्रमवारी पाहिली असता अमेरिका (२२.७९ ट्रिलियन डॉलर), चीन (१६.७० ट्रिलियन डॉलर), जपान (५.५०

ट्रिलियन डॉलर), जर्मनी (४.२५ ट्रिलियन डॉलर) आणि भारत (३.२० ट्रिलियन डॉलर) असा क्रम लागतो.

**५) तरुण लोकसंख्या आणि कर्त्या लोकांचे जास्त प्रमाण**

जगाच्या तुलनेत तरुण लोकसंख्येच प्रमाण भारतात सर्वात जास्त आहे. १८ ते ५९ वयोगटातील ६० टक्के लोक काम करतात. जगात एवढे प्रमाण कोणत्याही देशात नाही. तसेच उपभोग्य वस्तूंची मागणी सर्वात जास्त भारतात आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने**

१९४७ पासून सद्यकालापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेने अनेक चढउतार पाहिले. परंतु १९८५ नंतर खऱ्याअर्थाने भारतीय अर्थव्यवस्था सातत्याकडून परिवर्तनाकडे वळलेली दिसते. सद्यकाळामध्ये भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली असली तरी तीच्या समोर अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी काही प्रमुख आव्हाने पुढील प्रमाणे

**१) आर्थिक विषमता**

आर्थिक विषमता ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. भारतीय समाजामध्ये आर्थिक विषमतेतून श्रीमंत, गरीब व मध्यम असे वर्ग निर्माण झालेले पहावयास मिळतात. उत्पादनामधील आर्थिक विषमता भारतामध्ये मोठयाप्रमाणात पहावयास मिळते. भारतामध्ये श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत होत चालला आहे तर गरीब वर्ग अधिक गरीब होत चालला आहे. नुकताच जागतिक आर्थिक विषमतेचा अहवाल प्राप्त झाला त्यानुसार भारतामध्ये १० टक्के लोक श्रीमंत आहेत. त्यांच्याकडे भारताच्या एकूण संपत्तीच्या ६० टक्के संपत्ती आहे.मध्यम वर्गाकडे ३० टक्के संपत्ती आहे तर गरीबांच्याकडे रोजच्या खाण्यापिण्याचे प्रश्न आहे. गरीब व मजदूर वर्ग रोजच्या दैनंदिन जगण्यासाठी धडपडत आहे. या वास्तव परिस्थितीमधून भारतामध्ये आर्थिक विषमता मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहे. शहरातील झोपडपट्टया आणि ग्रामीण भागातील मोलमजूर यांच्या परिस्थितीचा अभ्यास केला असता भारतात मोठया प्रमाणात आर्थिक विषमता आहे हे समजून येते.

**२) बेरोजगारी**

जगातील सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताला ओळखले जाते. असे असले तरी भारतातील एकूण तरुणांच्या जवळपास ७ टक्के तरुणाच्या हाताला रोजगार नाही, दिवसेंदिवस बेरोजगारीची टक्केवारी वाढत आहे. त्यामुळे नवनवीन रोजगाराची दारे खुली करुन बेरोजगारी कमी करुन तरुणांच्या हाताला रोजगार देणे आवश्यक आहे. तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे चोरी, मारामारी, खून असे अनेक अनैतिक प्रकार घडत आहेत. ही बाब भारताच्या विकासाला खिळ देणारी आहे. थोडक्यात बेरोजगारी ही भारताच्या प्रगतीला, विकासाला अडथळा देणारी बाब आहे.

बेरोजगार तरुण अनैतिक मार्गाकडे मोठयाप्रमाणात वळण्याची दाट शक्यता असते. म्हणून तरुणाच्या हाताला कामाची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

**३) मानव विकास निर्देशांकामधील भारताचा घटता आलेख**

जागतिक पातळीवर मानव विकास निर्देशांकाच्या माध्यमातून प्रत्येक देशांतील लोकांच्या विकासाचे मोजमाप केले जाते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९३ देशांपैकी भारताचा १३१ क्रमांक होता, परंतु सदयकालामध्ये त्याच्या एक अंकांची घसरण होऊन भारत मानव निर्देशांकामध्ये १३२ व्या क्रमांकावर आहे. याचा अर्थ मानव विकास निर्देशांकामध्ये भारताचा घटता आलेख आहे. थोडक्यात मानव विकास निर्देशांकामध्ये भारताची घसरण होत आहे हे भारतासाठी एक आव्हान असून ते आव्हान भारताने पेलले पाहिजे. मानव विकास निर्देशांकाच्या आलेखामध्ये १०० च्या आत स्थान आणणे भारतापुढे आव्हान आहे. मानव विकास निर्देशांकामध्ये सरासरी जीवन आयुर्मान, दरडोई उत्पादन आणि शिक्षणाचे प्रमाण या तीन घटकाला आधारभूत मानून प्रत्येक देशांचा मानव विकास निर्देशांक ठरवला जातो. या तीन घटकाला प्राधान्य देऊन विकास साधणे आवश्यक आहे.

४) दहशतवाद, नक्षलवाद, धार्मिकवाद, प्रादेशिकवाद असमान प्रादेशिक विकास, भाषावाद हे देखील भारताच्या अर्थव्यवस्थेला अडथळा ठरत आहेत. थोडक्यात वरील सर्व घटक भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासातील आव्हाने आहेत.

**सारांश**


भारतीय अर्थव्यवस्था ही उदयन्मुख अर्थव्यवस्था असून विकसित अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. जागतिक अर्थव्यस्थेचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटनला मागे सारुन ५ व्या स्थानावर गेली आहे. १९४७ साली शुन्यापासून सुरुवात केलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे गेल्या ७५ वर्षात जागतिक पटलावर ५ व्या स्थानावर पोहचली आहे. भारताचा GDP दर जगामध्येविकसित देशाच्या तुलनेत चांगला आहे. भारतात परकीय गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे. भारतात नवनवीन गोष्टीला चालना मिळाल्यामुळे रोजगार निर्मितीमध्ये वाढझाली आहे. लघु उदयोगाला चालना देण्यासाठी मुद्रांक योजनेच्या माध्यमातून मोठयाप्रमाणात भारत सरकारने कर्जे देण्यास सुरुवात केली. परिणामी अंतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये मोठयाप्रमाणात वाढझाली. महिला साक्षरतेचे प्रमाण वाढल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली.

आधुनिक व तांत्रिक शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. थोडक्यात जगामध्ये सर्वात वेगवान वाढणाऱ्या अर्थव्यवस्थापैकी भारताची अर्थव्यवस्था एक महत्वाची अर्थव्यवस्था समजली जाते असे असले तरी भारतामध्ये आर्थिक विषमता, बेरोजगारी, मानव विकास निर्देशांकामधील भारताचा घटता आलेख, दहशतवाद, नक्षलवाद, धार्मिकवाद, प्रादेशिकवाद, भाषावाद आणि गरीब –श्रीमंत यातील दरी यावरती भारताला मोठयाप्रमाणात कार्य करावे लागणार आहे.

**संदर्भग्रंथ**

१. देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक–भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालय पब्लिकेशन हाऊस मुंबई –२०१० (सुधारित आवृत्ती)
२. रंजन कोळंबे – भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे–२०१०
३. Datta Ruddar Sundaram, S. Chand and Co.Ltd. New Delhi-2010
४. Weinberg report-2023
५. IMF –GDP report-2023

## 2. शाश्वत विकास: ध्येय आणि जागतिक परिस्थिती



MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Jan. To Mar. 2024
Special - Issue
01

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318



Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's

**SHRI SHAHAJI CHHATRAPATI MAHAVIDYALAYA**

Accredited by NAAC with Grade 'A' (CGPA-3.13)
2968, 'C' Ward, Dasara Chowk, Kolhapur- 4169002 (M.S.)
Phone : (0231)-2644204, Fax : 90231)-2641954
Affiliated to : Shivaji University, Kolhapur- 416004 (M.S.)

**ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR**
ON
**Sustainable Development in India:**
**Strategies & Emerging Trends in Businesses**

Saturday 16th March 2024

Organized by
**Department of Commerce & IQAC**

Venue
MAHARSHI V.R. SHINDE AUDITORIUM
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

: Cheif Editor :
Principal Dr. R.K. Shanediwan
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

: Editor :
Mr. S. H. Kamble
(Head, Dept. of Commerce)


Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

28) IMPACT OF GREEN INNOVATION ON CORPORATE SUSTAINABILITY
**Dr. Anita Yadav, Kolhapur** ||130

29) Building a Sustainable Future: Responsible Investing Strategies in India
**Shrikant Vasant Bacche, Kolhapur** ||134

30) साहस पर्यटनाच्या माध्यामातून शाश्वत विकास
**डॉ. सुरेश वसंत शिखरे, कोल्हापूर** ||136

31) शाश्वत विकास : ध्येये आणि जागतिक परिस्थिती
**डॉ. विजय जालिंदर देठे, दसरा चौक, कोल्हापूर** ||143

32) एकविसाव्या शतकातील भारताच्या शाश्वत विकासासाठी योगदान
**डॉ. अजितकुमार भिमराव पाटील, कोल्हापूर** ||147

33) खेल – शाश्वत विकास का एक महत्वपूर्ण प्रवर्तक
**Capt. Dr- Prashant Bibhishan Patil, Kolhapur** ||153

34) आदिवासी जनजीवन के परिप्रेक्ष्य में 'ग्लोबल गाँव के देवता'
**डॉ. सारिका राजाराम कांबळे, कोल्हापुर** ||156

35) सामाजिक उत्तरदायित्व से बेखबर कार्पोरेट जगत
**प्रो. डॉ. सरोज पाटील, कोल्हापुर** ||159

36) शाश्वत विकाससाठी आमचे शेतीतील काही प्रयोग
**डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील, कोल्हापूर** ||163

37) INNOVATION AS A BOOSTER OF RURAL ENTREPRENEURSHIP: A CASE....
**Dr. Ramdas N. Bolake, Kankavli, Dist- Sindhudurg** ||168

38) Sustainable Agricultural development for inclusive economy....
**Milind. M. Shinde, Dr. Anup Mule** ||173

39) Eco-Friendly Tourism in India: Promoting Sustainable Hospitality
**Nikita Nitin Urunkar, Kolhapur** ||177

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

31

# शाश्वत विकास : ध्येये आणि जागतिक परिस्थिती

**डॉ. विजय जालिंदर देठे**
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर

**********

**प्रस्तावना :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर सुरु झालेल्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमुळे पर्यावरणाचे प्रदूषण वाढत आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही जाणीव जागतिक बनण्याबरोबरच १९८० च्या दशकात शाश्वत विकासाची संकल्पना उदयास आली. शाश्वत विकास या विषयावर १९७२ च्या स्टॉकहोम पर्यावरण परिषदेमध्ये प्रकाश टाकण्यात आला. राष्ट्रीय विकास म्हणजे आर्थिक समृद्धी हे समीकरण बनल्यामुळे विकसित व विकसनशील देशांनी आर्थिक समृद्धीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पर्यावरणाचा बळी दिला. तसेच या राष्ट्रांनी आपल्या आर्थिक समृद्धीसाठी पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीची मोठया प्रमाणात लुट केली. परिणामी पर्यावरणाचे प्रदूषण वाढून मानवाला नैसर्गिक आपत्तींना तोड द्यावे लागले. विकासाची ही प्रक्रिया आत्मघातकी आहे. शाश्वत विकासाची ही संकल्पना सर्वसमावेशक व बहुअंगी असल्यामुळे त्याचा अर्थ अनेक प्रकारे घेतला जातो. शाश्वत विकासाची संकल्पना ही नैसर्गिक साधन संपत्तीच्या विवेक बुद्धीने आणि दूरदृष्टीने वापर करण्यावर आधारित आहे. प्रस्तुत संशोधक लेखामध्ये 'शाश्वत विकास रू ध्येये आणि जागतिक परिस्थिती' या विषयावर विविध मुद्दयाच्या आधारे संशोधनात्मक आढावा घेण्यात येणार आहे.

**उद्दिष्टे :**

'शाश्वत विकास : ध्येये आणि जागतिक परिस्थिती' या विषयाच्या संशोधनाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे समोर ठेवून संशोधन लेख लिहिण्यात आला आहे.

१) शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेणे.

२) शाश्वत ध्येयाचा अभ्यास करणे.

३) शाश्वत विकास महत्त्वाचा का याचा अभ्यास करणे.

४) शाश्वत विकास आणि जागतिक परिस्थितीचा आढावा घेणे.

**शाश्वत विकासाची आवश्यकता :**

आधुनिक जगामध्ये जागतिक पातळीवर विकासाच्या व नवनवीन संशोधनाच्या नावाखाली मोठया प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीचा अति वापर होत आहे. औद्योगिक व आर्थिक विकासाच्या माध्यमातून नागरिकांच्या गरजांची पुरतात करण्याचा व नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पर्यावरणाचा अतिवापर होत असताना दिसतो. यामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झालेल्या पहावयास मिळतात. लोकसंख्या वाढीचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. कारण वाढत्या लोकसंख्येबरोबरच नैसर्गिक साधन संपत्तीची लुट वाढत आहे. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात प्रचंड स्पर्धा चालू आहे. औद्योगिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे स्वरूप संकुचित आहे.

भावी पिढीच्या गरजांचा विचार करून वर्तमान पिढीच्या गरजांची पूर्तता करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. परंतु औद्योगिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रीयेमध्ये केवल वर्तमान पिढीच्या गरजा भागविण्याचा स्वार्थी हेतु होता. परिणामी नैसर्गिक साधन संपत्तीची लुट मोठ्या प्रमाणात केली. या सर्वाचा परिणाम म्हणजे हवा, पाणी, जमीन, यांचे प्रदूषण वाढले त्यामुळे मानवाच्या व प्राण्याच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. या विकासाच्या प्रक्रियेत विकसित व विकसनशील राष्ट्रे यांच्यामधील आर्थिक विकासाची दरी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. जगातील विकसित व विकसनशील राष्ट्रे भविष्याचा विचार न करता वर्तमानाचा विचार करीत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे वर्तमानाबरोबरच भविष्याचा सुद्धा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे. अशा पद्धतीची शाश्वत विकासाची संकल्पना अपेक्षित आहे.

**शाश्वत विकासाची ध्येये :**

आपल्या आर्थिक, पर्यावरणीय व सामाजिक गरजा आजच्या पिढीच्या व भावी पिढ्यांच्याही पूर्ण व्हाव्यात व त्यांच्यात समतोल साधला जावा हेच शाश्वत विकासाचे ध्येय किंवा उद्दिष्ट आहे. सर्वांना चागले व शाश्वत भविष्य मिळावे यासाठी २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत पुढील १७ ध्येये २०३० पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे ती ध्येये पुढील प्रमाणे—

**१) दारिद्रय निर्मुलन —**

जगामधील सर्व ठिकाणच्या आणि सर्वप्रकारच्या गरीबीचे व दारिद्रयाचे निर्मुलन करणे.

**२) भूक निर्मुलन —**

अन्न सुरक्षा साधने, भूक मिटविण्यासाठी सुधारित पोषण आहार उपलब्ध करून देणे तसेच नैसर्गिक शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.

**३) निरोगी आरोग्य—**

आरोग्यपूर्ण जीवन सुनिश्चित करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.

**४) दर्जेदार शिक्षण —**

सर्व समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे, सर्वांना निरंतर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

**५) लैगिक समानता—**

लिंग समानता व महिलांचे आणि मुलींचे सक्षमीकरण व सबलीकरण साधणे.

**६) शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता —**

पाणी व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे व शाश्वत व्यवस्थापन करणे.

**७) आधुनिक आणि स्वस्त उर्जा —**

सर्वांनी परवडणारी, विश्वासाहर्ता, शाश्वत आणि आधुनिक उर्जा साधन उपलब्ध करून देणे.

**८) आर्थिक वाढीला चालना आणि रोजगार उपलब्धी—**

शाश्वत सर्वसमावेशक आर्थिक वाढीला चालना देणे व सर्वांनी पूर्णवेळ उत्पादक व चांगला रोजगार उपलब्ध करून देणे.

**९) नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा —**

पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे सर्वसमावेशक व शाश्वत औद्योगिकीकरण करणे आणि कल्पकतेला वाव देणे.

**१०) असमानता दूर करणे—**

विविध देशांमधील व देशांतर्गत असणारी आसमानता दूर करणे.

**११) शाश्वत शहरे आणि समाज —**

शहरे व मानवी वस्त्या अधिक समावेशक, सुरक्षित, लवचिक व शाश्वत करणे.

**१२) उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर—**

निसर्गामध्ये उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर करणे. उत्पादक व उपभोगाच्या पद्धती शाश्वत रुपात आणणे.

**१३) हवामानाचा परिणाम —**

हवामान बदल व त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी त्वरित उपयायोजना करणे.

**१४) शाश्वत महासागर —**

महासागर व समुद्रांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी सबंधित संसाधनांचा शाश्वतपणे वापर करणे.

**१५) जमिनीचा शाश्वत उपयोग —**

भूपृष्ठीय परिसंस्थेचा शाश्वत पद्धतीने वापर करणे, वनांचे शाश्वत व्यवस्थापन करणे, जमिनीचे वाळवंटीकरण रोखणे, जमिनीचा ऱ्हास थाबविणे व जैवविविधतेची हानी रोखणे.

**१६) शांतात आणि न्याय —**

शाश्वत विकासासाठी शांततापूर्ण व सर्वसमावेशक समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे कोणालाही न्याय मिळवून देण्यासाठी अडचण येऊ नये यासाठी परिणामकारक, जबाबदार व समावेशक संस्थांची सर्व स्तरांवर उभारणी करणे.

**१७) शाश्वत विकासासाठी भागीदारी —**

शाश्वत विकासासाठी जागतिक भागीदारी निर्माण व्हावी यासाठी अंमलबजावणीची साधने विकसित करणे.

जागतिक शाश्वत विकास अहवाल

शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने देशांच्या प्रगतीचे हे जागतिक मुल्यांकन आहे. हा अहवाला संयुक्त राष्ट्राच्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट सॉल्यूशन नेटवर्कद्वारे प्रकाशित केला जातो. १०० टक्के गुण असे सूचित करतात कि सर्व शाश्वत विकास

ध्येये साध्य झाले आहेत तर ० गुण हे शाश्वत विकास ध्येये साध्य झाले नाहीत हे निश्चित करते. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भारताची स्थिती चांगली नाही आणि इतर देशांच्या तुलनेत भारताची तयारी सुद्धा गेल्या काही वर्षात खराब झाल्याचे आढळून येते. भारताला १७ उद्दिष्टांपैकी ११ उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे भारताची क्रमवारी घसरत आहे. घक्त उद्दिष्टापैकी १३ व्या उद्दिष्टातील हवामानतील बदल आणि त्याचे परिणाम सोडविण्यासाठी त्वरित कारवाई हे साध्य करण्याच्या मार्गावर आहे. भारत, उपासमार संपविणे, चांगले आरोग्य, शुद्धपाणी व स्वच्छता ही ध्येय साध्य करण्याच्या प्रगतीवर आहे. शाश्वत विकासाच्या जागतिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी २०३० हे साल निश्चित केले आहे. सात वर्षे आजून शिल्लक असताना अहवालानुसार भारत हा उद्दिष्टे साध्य करण्याच्या मार्गावर नाही. जागतिक शाश्वत विकास अहवालानुसार पहिल्या पाच क्रमांकाचे देश पुढील प्रमाणे

**तक्ता क्र —१**

**शाश्वत विकास अहवाल गुण तक्ता**

| रँक | देश | गुण |
|---|---|---|
| १ | फिनलँड | ८६.५ |
| २ | डेन्मार्क | ८५.६ |
| ३ | स्वीडन | ८५.२ |
| ४ | नॉर्वे | ८२.३ |
| ५ | ऑस्ट्रेलिया | ८२.३ |

**तक्ता क्र —२**

**भारत व शेजारील देश**

| रँक | देश | गुण |
|---|---|---|
| ५६ | चीन | ७२.४ |
| ७० | भूतान | ७०.५ |
| ७६ | श्रीलंका | ७०.० |
| ९८ | नेपाळ | ६६.२ |
| १०४ | बांगलादेश | ६४.२ |
| १२१ | भारत | ६०.३ |
| १२५ | पाकिस्तान | ५९.३ |
| १४७ | अफगाणिस्तान | ५२.५ |

जागतिक शाश्वत विकासामधील भारताची घटती कामगिरी

**तक्ता क्र. ३**

**पाच वर्षांमधील भारताची कामगिरी**

| वर्ष | रँक | गुण |
|---|---|---|
| २०१९ | ११५ | ६१.१ |
| २०२० | ११७ | ६१.९२ |
| २०२१ | १२० | ६०.०७ |
| २०२२ | १२१ | ६०.३२ |
| २०२३ | ११२ | ६३.५ |

शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी २०१६ ते २०२२ पर्यंत भारताची स्थिती चागली नाही. २०२३ मध्ये जराशी शाश्वत विकासासंदर्भात सुधारणा होताना दिसते. भारतासह विकसनशील देशांनी भविष्यातील तरलता संकटांना रोखण्यासाठी त्यांची कर्जे धोरणे, धोरणे, निर्यात धोरणे आणि तरलता व्यवस्थापनासह एकत्रित करून त्यांचे कर्ज व्यवस्थापन

आणि पतपुरवठा मजबूत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर एकाच वेळी आरोग्य, हवामान, जैवविविधता, भू– राजकीय आणि लष्करी संकटे हे शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये मोठे अडथळे येत आहेत.

**शाश्वत विकासाचे घटक :**

शाश्वत विकास या शब्दात नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनांचा जपून आणि योग्य तितका वापर करणे अपेक्षित आहे. जागतिकीकरणामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक संसाधने आज मोठया प्रमाणत आणि अनियंत्रीत वापरली जात आहेत. शाश्वत विकासाबरोबरच पृथ्वीवरील इतर जीवसृष्टीचाही विचार केला जातो. शाश्वत विकासाची संकल्पना ही वर्तमान आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि सुधारलेले पर्यावरण उपलब्ध करून देण्यावर आधारित आहे. शाश्वत विकासाची संकल्पना ही केवळ वर्तमानात नाही तर भविष्यकालीन पिढीच्या कल्याणावर देखील लक्ष केंद्रित करणारी प्रक्रिया आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचे अस्तित्व कायमस्वरूपी नाही. या संपत्तीचा सातत्याने ऱ्हास होत असतो. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाचा समतोल टिकवून धरण्यास प्राधान्य आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी सामुदायिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. हवा, पाणी व जमीन यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक आहेत. शाश्वत विकासाचा सबंध नैसर्गिक साधन संपत्तीच्या विवेकपूर्ण व्यवस्थापनाशी आहे. विवेकपूर्ण व्यवस्थापनातून सध्याच्या पिढीच्या गरजापूर्ण होण्याबरोबरच भविष्यकालीन पिढीच्या कल्याणासाठीही तरतूदी होऊ शकतील.

**सारांश :**

शाश्वत विकासाचा मार्ग मानवाला आर्थिक प्रगतीकडे घेऊन जाईल. जर त्यातील आर्थिक फायदयांचे सर्वांना समान वाटप झाले तर समाजातील गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी होईल. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो सध्याच्या पिढीतील गरजांची पूर्तता करताना भावी पिढीतील गरजांच्या क्षमतेला धक्का न पोहोचवता केलेला विकास व्यक्तीच्या आर्थिक, पर्यावरणीय व सामाजिक अशा सर्व गरजा आजच्या पिढीच्या व भावी पिढयांच्या ही पूर्ण व्हाव्यात व त्यांच्यात समतोल साधला जावा हेच शाश्वत विकासाचे ध्येय आहे. सौर उर्जा, पवन उर्जा या सारख्या नवीनकरणक्षम उर्जास्त्रोतांचा जास्तीत–जास्त वापर शाश्वत विकासाचा पाया आहे.

अनियंत्रित इंधन उपसा, जंगल तोड, अनिर्बंध जलउपसा आणि वापर, औद्योगिकरण आणि लोकसंख्यावाढ, प्रदूषण या सर्वांमुळे शाश्वत विकासाला बाधा निर्माण होते. शाश्वत विकासात माणसाबरोबरच पृथ्वीवरील इतर जीवसृष्टीचाही विचार केला जातो. माणूस हा पृथ्वीवरील एका साखळीचा भाग आहे. त्या साखळीच्या मर्यादा लक्षात घेऊन त्याची वागणूक असली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) रंजन कोळंबे, पर्यावरण आणि शाश्वत विकास

२) आंतरराष्ट्रीय शाश्वत विकास निर्देशांक –२०२३

३) Sustainable Development Solution Network Report-2023

❑❑❑